पर्यावरणीय शेती हाच पुढील मार्ग

इंद्राणी ही तामिळनाडूमधील पेत्राग्राम तालुक्यातील मंगराई गावची एक छोटी शेतकरी आहे. तिच्याकडे एकूण एक एकर कोरडवाहू शेती आहे. तिचे पती शासकीय नोकरीत रुजू आहेत. त्यामुळे शेतीकडे त्यांचे दुर्लक्ष होत होते. तरीही इंद्राणी शेती करते. त्यांची शेती कोरडवाहू असल्याकारणाने बारमाही शेती न करता खरीप हंगामात पावसाच्या पाण्यावर येणारे धान (भात) व भुईमूग सारखी पिके घेत असे. इंद्राणी ह्यांना पर्यावरणीय शेती म्हणजे काय व ती कशी करावी याची पुरेपूर माहिती नसल्याकारणाने त्या गावपातळीवर असलेल्या कृषी सेवा केंद्रामधील लोक देत तेच रासायनिक निविष्ठा व फवारे तसेच तणनाशके वापरून शेती पिकवत असे. अन्य काही पर्याय असेल हे तिला माहितच नव्हते.

इंद्राणी ही महिला केवळ बचत गटाची सदस्यच नाही तर ती चार महिला बचत गट ही चालवते. हे सर्व बचत गट मायराडा (MYRADA) या सामाजिक संस्थेने १२ वर्षांपूर्वी तयार केलेले आहे. संस्थेच्या डायरेक्टर बॉडीच्या मिटिंगमध्ये दर महिन्याला होते. इंद्राणी स्थानिक कार्यकर्ता/संचालक या नात्याने त्यांच्या सर्व मिटिंगला आवर्जून उपस्थित राहतात. अशाच एका मिटिंगमध्ये (MYRADA) चे यांनी AMEF या संस्थेने आयोजित केलेल्या शेतकऱ्यांच्या शेती शाळेचे महत्त्व व फायदे सांगितले. AMEF ही एक सामाजिक संस्था आहे. संस्था इंद्राणी ह्यांच्या शेजारीलच गावांमध्ये काम करत आहे आणि ह्या संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात शेतकऱ्याच्या पर्यावरणीय शेती शाळेचे अनुभव ऐकता इंद्राणी यांच्या असे लक्षात आले की त्यांच्या शेतीतून त्यांना जितके मिळाले पाहिजे तितके उत्पन्न मिळत नाही. तेव्हा पहिल्यांदाच तिला माहिती झाली की पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही शेती करता येते. त्यानंतर त्यांनी पर्यावरणीय शेती कशी करावी याची माहिती घेण्यास सुरुवात केली. ज्या महिलांना प्रशिक्षण मिळाले होते. त्यांच्याकडून मदत घेऊन इंद्राणीने पर्यावरणीय शेती करण्याचे ठरविले.

सन २०१५ मध्ये जेव्हा AMEF या संस्थेने इंद्राणी यांच्या गावामध्ये येऊन तेथील शेतकऱ्यांना पर्यावरणीय शेती कशी करावी याची माहिती देण्यास सुरवात केली तेव्हा इंद्राणी हिनेच प्रथम पुढाकार घेतला. त्यानंतर प्रत्येक शेती शाळेत सहभाग घेऊन पर्यावरणीय शेती कशी करावी याबद्दलचा अभ्यास केला. अशा खूप साऱ्या शेती शाळेतील अभ्यास व त्याच्यासोबत स्वतःच्या शेतीत प्रात्यक्षिक करता करता इंद्राणी यांच्या मनात आता एक विश्वास निर्माण झाला होता की त्या आता त्यांना शेतीत येणारी कोणतीही अडचण त्या सहजपणे ओळखून त्यावर उपाययोजना करू शकतात. त्यांनी पर्यावरणीय शेती पद्धतीप्रमाणे वनस्पतीजन्य कीटकनाशके तयार करून वापरणे, पिवळे चिपकू सापळे शेतीत लावणे जेणेकरून पिकांवर येणारी रस शोषक कीटके व अळ्या यांचे प्रमाण कमी होईल, तसेच त्यांनी भुईमूग पिकामध्ये उगवलेली करडई कापली नाही त्यामुळे भुईमूगमध्ये येणारे तणाचे नियंत्रण झाले. इंद्राणी यांनी रासायनिक खताला पर्यायी जैविक खतांचा मात्रा वापरण्यास सुरवात केली व त्यानंतर त्यांच्या शेतीवर होणाऱ्या एकूण खर्चातही घट होण्यास मदत झाली. इंद्राणी ह्या असेही म्हणतात कि ''मी माझ्या शेतीत वापरत असलेले वनस्पतीजन्य कीटकनाशक, पिवळे चिपकू सापळे तसेच अर्क स्वतः तयार करते. मी पूर्णपणे रासायनिक निविष्ठा तसेच कीटकनाशक यांचा वापर बंद केला आहे. कारण त्यासाठी प्रती एकर आठ ते दहा हजार रुपयांचा खर्च करावा लागत होता. पण आता मला पर्यावरणीय शेतीत लागणारे जैविक निविष्ठा व कीटकनाशक तयार करण्यास जवळपास चार हजार रुपये खर्च होत आहे त्यामुळे तीन ते चार हजार प्रती एकर माझी बचत होत आहे .''

सन २०१६ मध्ये पडलेल्या दुष्काळामध्ये इंद्राणी ह्यांचे पीक बचावले होते त्यास एकमेव कारण म्हणजे शेतीमध्ये जैविक निविष्ठाचा वापर इंद्राणी ह्यांना जैविक शेतीचे तसेच माती व मातीमधील ओलाव्याचे संवर्धन करणे किती महत्त्वाचे आहे हे समजले होते आणि त्यामुळेच त्यांनी त्यांच्या जमिनीत हिरवळी खते म्हणजे करडई कापून न टाकता तशीच जमिनीत गाडली त्यामुळे जमिनीत सूक्ष्म अन्नद्रव्याचे प्रमाण जमिनीत वाढण्यास मदत झाली. त्याचबरोबर जमिनीला जैविक व वनस्पतीजन्य खतांची मात्रा दिल्याने व उताराला आडवी नांगरणी करून पिकाची पेरणी केल्याने पावसाचे पाणी जमिनीत वाहून न जाता ते जमिनीतच मुरण्यास मदत झाली. पर्यायी जमिनीतील ओलावा टिकून ठेवता आला. इंद्राणी ह्यांनी असेही सांगितले की, ''जेव्हा पिकाची वाढीची अवस्था सुरू झाली म्हणजे भुईमूगाचे पीक फुलावर येऊन जमिनीत शेंगा धरण्याची वेळ आली तेव्हाच नेमके जमिनीतील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असणारा ओलावा पिकाला मिळाला नाही आणि त्यामुळेच इतर सर्व शेतकऱ्यांच्या हातातून त्यांचे पीक गेले. पण इतर सर्व शेतकऱ्यांच्या तुलनेत अशाही अवस्थेत माझे भुईमूगाचे पीक ५०% ते



श्रीमती इंद्राणी पर्यावरणीय शेतीचा सराव करताना आपल्या शेतात

६०% बचावले व त्यातून उत्पन्नही मिळाले. इतर सर्वांच्या तुलनेत मला फक्त ४०-५०% एकूण उत्पन्नात घट झाली होती.

इंद्राणी ही महीला शेतकरी आता त्यांच्या शेतीत भुईमूग, नागली नाचणी यांसारख्या पिकांना लागणारे जैविक निविष्ठा तसेच वनस्पतीजन्य कीटकनाशक याची प्रात्यक्षिके खूप आनंदाने करत आहेत. तसेच इंद्राणी स्वत: आता पर्यावरणीय शेतीचा प्रसार करण्यासाठी तीन बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देत आहेत. तसेच त्यांचे अनुभव गावांतील ग्रामसभा व ग्रामपंचायत मिटिंगमध्ये मांडत आहेत. पर्यावरणीय शेतीचे महत्व सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. इंद्राणी आता पूर्ण विश्वासाने म्हणत आहेत की, प्रत्येक जमिनीत पर्यावरणीय शेती केली तरच आपण आपल्या गावांमधील स्वच्छ आणि सुंदर व आरोग्यवर्धक पर्यावरण पूर्ववत करू शकतो.

श्रीमती इंद्राणी यांना ९९४३३१६२४९ यावर संपर्क करु शकता.

The writeup has been developed by
Mr. J. Krishnan, AMEF
Email : krish72oxigen@gmail.com

मराठी अनुवाद : पूजा पाटील

Source : Ecological Farming is the way forward – LEISA India, September,2018.